**<u>सीएनआर नं. एमएचएसआय–०७–०००१५–२०११</u>**

**<u>नि.दि.मु.क्र. ०४/२०११ मधील नि.क्र. ११७ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा दावा हक्कप्रस्थापना, ताबा व कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम ९ अन्वये न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अर्जातील वादींचे थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तुतकामी त्यांनी खरेदीखते त्यांच्यावर बंधनकारक नसल्याचा व ती रद्दबातल असल्याचा ठराव होण्याकरीता, तत्परिणामी कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेकरीता व वैकल्पिकरित्या कब्जा मिळणेसाठी याकामी दाद मागितलेली आहे. प्रतिवादींनी कैफियती दाखल करुन हरकती नोंदविलेल्या आहेत. वादग्रस्त मिळकत मुळ स.क्र. ४०(४९१) हि.क्र. १६ क्षेत्र ०–०७–० खराबा ०–८४.० आकार रुपये ०–०१ याचे महसूलदफ्तरी बेकायदेशीरपणे विभाजन करुन हि.क्र. १६/१ ते १६/७ असे हिस्से क्रमांक तयार करण्यात आलेले आहेत. वादींच्या पुर्वाधिका–यांनी दि. ०७/०६/१९३२ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखताने चतु:सिमापुर्वक चार आणे जमिनीचे क्षेत्र खरेदी केलेले असून, सदर मिळकतीत एक शेतमांगर सुध्दा उभा केलेला आहे. प्रतिवादी हे दांडगाईने व दादागिरीने वादींच्या मिळकतींमधील कब्जेवहिवाटीच्या चार आणे हिश्श्याच्या जमिनीच्या क्षेत्रात अतिक्रमण करण्याचे गैरहक्की, गैरकायदा व घुसखोरी करण्याचे प्रयत्न करीत आहे. दाव्याचे कामकाज सुरु असताना त्यांनी दांडगाईने बांधकाम करण्यासाठी दगडी चिरे व बांधकामाचे साहित्य आणून वादींच्या कब्जेवहिवाटीच्या मिळकतीस दगडी कुंपण करुन प्रतिवादी क्र. १० याने अतिक्रमण करण्याचे कृत केलेले आहे. त्यामुळे वर नमूद मिळकतीतील वास्तव परिस्थिती, अतिक्रमणाची लांबी रुंदी, मिळकतीतील वई आडे, गडगे, जाण्यायेण्याचे मार्ग, घर, मांगर, संडास, बाथरुम व झाडे याची वस्तुस्थिती नकाशासह अहवालाद्वारे अभिलेखावर येण्याकरीता न्यायालयीन आयुक्त उपअधीक्षक, भूमी अभिलेख मालवण यांची नेमणूक करण्यात यावी. न्यायालयीन आयोगासाठीचे लागणारे शुल्क वादी भरण्यास तयार आहेत. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती वादींनी केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. १५ याने आपले म्हणणे सादर करुन अर्जास आक्षेप नोंदविला आहे. सदर प्रतिवादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नसून केवळ पुरावा गोळा करण्याकरीता अर्ज दाखल करण्यात आलेला असल्याने तो नामंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती सदर प्रतिवादीने केलेली आहे.

०४. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. ६, ८, १०, १३ व १८ यांचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नाही. दावा अत्यंत जुना असून दाव्याच्याकामी आपणास मेरीट नाही याची पुर्ण जाणीव वादींना आहे. केवळ वेळ काढण्यासाठी व पुरावा गोळा करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आलेला असल्याने तो फेटाळण्यास पात्र आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती सदर प्रतिवादींनी केलेली आहे.

०५. वादींतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. एम.बी.सुकाळी, प्रतिवादी क्र. १५ याच्यातर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. जी.जे. गिरकर यांनी केलेला आणि प्रतिवादी क्र. ६, ८, १०, १३ व १८ यांच्यातर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. एस.एस. गवाणकर यांचा संपूर्ण युक्तिवाद ऐकला. वाद—प्रतिवादकथनांचे प्रस्तुत अर्जाच्या अंतिम निर्गतीच्या दृष्टिकोनातून अवलोकन केले. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा हा वादग्रस्त मिळकतींपैकी काही हिश्श्याची झालेली खरेदीखते ही बेकायदेशीर असून ती वादींवर बंधनकारक नाहीत असा ठराव होवून मिळणेसाठी, मिळकतींमधील वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत तथा अडथळा करु नये असा कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी व वैकल्पिकरित्या कब्जा मिळणेसाठी त्यांनी दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी कैफियती दाखल करुन वादकथने फेटाळून लावलेली आहेत. माझ्या पुर्वाधिका—यांनी नि.क्र. ७१ वर वाद—प्रतिवादकथनांवरुन मुद्दे निश्चित केलेले आहेत असे दिसून येते. संपूर्ण वादकथने पाहता वादग्रस्त मिळकतीतील अतिक्रमणाची वादींची केस सादर झाली असल्याचे दिसून येत नाही. याउलट प्रस्तुत अर्जाद्वारे वादी ज्या बाबी न्यायालयीन आयोगाद्वारे अभिलेखावर आणू पाहत आहेत त्यावरुन ते त्यांच्यावतीने पुरावा गोळा करु पाहत असल्याचे अर्जावरुन स्पष्ट होणारे आहे. परंतु कायद्याने तसे करता येणार नाही. कायद्यातील ही सर्वमान्य बाब आहे की, एखाद्या मिळकतीत कोणत्या

**<u>नि.दि.मु.क्र. ०४/२०११ मधील</u>**

**<u>नि.क्र. ११७ वरील आदेश</u>**

पक्षकाराचा कब्जा आहे हे दर्शविण्याकरीता न्यायालयीन आयोगाची मागणी मंजूर करता येणार नाही. तसेच एखाद्या पक्षकाराच्यावतीने पुरावा गोळा करण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करता येत नाही. अर्ज मंजूर करण्याने वादींच्यावतीने पुरावा जमविल्यासारखे होणार आहे. तसे झाल्यास दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम ९ या तरतूदीपाठीमागील मुळ उद्देश असफल होणार आहे. अर्ज मंजूर करण्याने प्रतिवादींचेच अपरिमित असे नुकसान होणार आहे. वादींना प्रस्तुतकामी अन्य सबळ व पुरक पुराव्यानिशी त्यांची केस शाबीत करण्याचे कायदेशीर अधिकार आहेत. परंतु त्याकरीता वादींना न्यायालयीन आयोगाची मदत मुळीच घेता येणार नाही. सबब वरील संपूर्ण विवेचनावरुन अर्ज नामंजूर करावा लागेल. करीता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर केला.)

सही/—

दिनांक—२० मार्च, २०१९ (आर.आर.काळे)

मालवण दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
मालवण.